# पुणे महानगरपालिका
## * स्थायी समिती *
## कार्यपत्रिका क्रमांक ४४

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २२/१/२०१९** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

### माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. २२५७**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांच्या अखत्यारीतील दि.१६ ते दि.३१ डिसेंबर २०१८ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेल्या कामाची माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पक्र.५/१०६६ दि.११/१/२०१९ चे पत्र.

### सर्वात कमी रकमेचे टेंडर्स

**विषय क्र. २२५८**

१३० दलली/दिन बहिरोबा मैलापाणी शुध्दीकरण केंद्र येथील प्रथम व द्वितीय स्वच्छक व वाळू स्वतंत्रक दुरुस्त करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.व्होल्टास लिमिटेड यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,४४,५२,२००/- पेक्षा ०७% कमी दराने) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,४४,५२,२००/- या रक्कमेपर्यंत चोवीस महिन्यांसाठी काम करुन घेणेसाठी त्यांचेशी करार करण्यास तसेच त्यापोटी बील अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/विदयुत/पापु व मलनि/१०६५ दि.११/१/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. २२५९**

प्रभाग क्र. २० मध्ये जी.पी.ओ.समोरील पदपथ विकसित करणे व परिसराचे सुशोभिकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.शिवस्वयंभु रिअल्टर्स यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३७,३५,२९६/- पेक्षा ५% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.३९,२२,०६०=८ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ४,४८,२३५=५२ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये१६,५३६=७८ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये २३,८८८/- अधिक टेंडर अटीशर्तीतील विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१०७२ दि.११/१/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. २२६०**

प्रभाग क्र. २७ ड मध्ये स.नं.१ मध्ये शाळेची नविन इमारत बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.चंद्राई कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,५६,५९,००१/- पेक्षा ९.९९९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,४०,९३,११६=५५ पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये १८,७९,०८०=१२ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये २,३३,२११/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ५३,१३०/- पर्यंत अधिक टेंडर अटी शर्तीनुसार सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/११४० दि.१७/१/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. २२६१**

प्रभाग क्र. १० ड स.नं. ७७/१ पार्ट पुणे महानगरपालिकेच्या कोथरुड बावधन कार्यक्षेत्रासाठी फायर स्टेशन बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार तेजस डेव्हलपर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३,६५,३४,२५५/- पेक्षा ०.१५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३,६५,२८,७७४=८६ उपलब्ध तरतुदी पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ४३,८४,११०=६० अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये८९,०४४=२० अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये १०,९५,५३६=३८ अधिक निविदा अटी शर्तीनुसार

भाववाढ सुत्रानुसार संबंधित घटकांचे तसेच सिमेंट, स्टील या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/११४१ दि.१७/१/२०१९ चे पत्र.

**एकच टेंडर प्रकरणे**

**विषय क्र. २२६२**

अलंकार टॉकीज जवळील रेल्वे ओव्हर ब्रिज चे युटीलिटी व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.अतुर इंडिया प्रा.लि. यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु.१,०७,०८,४१४=९४ पेक्षा २.५% जास्त तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,०९,७६,१२५=३ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये १३,१७,१३५=०४ पर्यंत अदा करणेस व टेंडर अटीशर्तीनुसार डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्र)/११०२ दि.१५/१/२०१९ चे पत्र.

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. २२६३**

महाराष्ट्र महानगरपालिका प्रांतिक अधिनियम कलम २०८ प्रमाणे करणेत येत असलेल्या कारवाईबाबत अतिक्रमण विभागामार्फत मा.मुख्य सभा ठराव क्रमांक ७११ दिनांक २०/१२/२०१७ अन्वये रिमुव्हल चार्जेस आकारणेची कार्यवाही करणेत येत असून महानगरपालिका हद्दीतील अवजड वाहने, हलकी वाहने व इतर वाहने निर्बंध असलेल्या रस्त्यांवर व इतर सर्व रस्त्यांवर निर्बंध असलेल्या ठिकाणी पार्किंग/उभी केल्याबद्दल वाहने न उचलता जागेवर दंड आकारणीची कार्यवाही वाहतुक पोलिस विभागामार्फत खालील तक्त्यातील नमूद केलेल्या दरानुसार करणेत येत असून सदर बाब निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्र)/८२५ दि.१५/१२/२०१८ चे पत्र.

| अ.क्रं. | वाहन प्रकार | तपशील | विशेष आकार |
|---|---|---|---|
| १ | अवजड वाहने | निर्बंध असलेल्या रस्त्यांवर व इतर सर्व रस्त्यांवर , निर्बंध असलेल्या ठिकाणी वाहन पार्क केल्याबद्दल | र.रू.५,०००/-प्रत्येकी |
| २ | हलकी वाहने | सर्व रस्त्यांवरील ( १० टनापर्यंत वहन क्षमता असलेली ) निर्बंध असलेल्या ठिकाणी वाहन पार्क केल्याबद्दल | र.रू.२,५००/- प्रत्येकी |
| ३ | कार,जीप इ. वाहने | सर्व रस्त्यांवरील निर्बंध असलेल्या ठिकाणी वाहन पार्क केल्याबद्दल | र.रू.२,०००/- प्रत्येकी |
| ४ | सहा व तीन आसनी रिक्षा आणि तीन चाकी टेम्पो | बंदी असेल्या रस्त्यांवर व निर्बंध असलेल्या ठिकाणी वाहन संचलन व पार्क केलेबद्दल. | र.रू.१,५००/-प्रत्येकी |
| | | इतर सर्व रस्त्यांवर निर्बध असलेल्या ठिकाणी वाहन पार्क केलेबद्दल. | र.रू.१,०००/- प्रत्येकी |
| ५ | इतर यंत्रसामुग्री/रोड रोलर | सर्व रस्त्यांवरील निर्बंध असलेल्या ठिकाणी वाहन पार्क केलेबद्दल | र.रू.३,०००/- प्रत्येकी |
| ६ | स्वयंचलित दुचाकी वाहने | सर्व रस्त्यांवरील निर्बंध असलेल्या ठिकाणी वाहन पार्क केलेबद्दल. | र.रू.१,०००/- प्रत्येकी |

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.८/१/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २२६४**

मनपा भवन येथे विस्तारीत इमारत बांधणे व पुणे मनपा मिळकतीमध्ये क्षेत्रिय कार्यालय/प्रशासकीय इमारतीचे विस्तारीकरण करणेकरीता खालीलप्रमाणे वर्गीकरणाने तरतूद र.रू. १२.५० कोटी उपलब्ध करून देणेस मा. स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/६४९ दि.३०/१०/२०१८ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक,<br>समाज विकास विभाग, | | |
| १) पुणे शहरात लाईट हाऊस प्रकल्प सुरू करणे, (FE14D136), पान क्र.१४२. | ३०० लाख | ---- |
| २) पुणे शहरातील रस्त्यावरील मुलांकरीता विविध उपक्रम राबविणे, | ७५० लाख | ---- |

| | | |
|---|---|---|
| (FE14C208) पान क्र. १४०.<br>३) आरोग्य विभाग, कैलास स्मशानभुमी येथील बायोमेडिकल वेस्ट प्लँट समोरील ट्रान्सफॉर्मर स्थलांतर करणे व इतर सुधारणा कामे करणे व विद्युत दाहिनी बसविणे (RE17F236), पान क्र. ६०. | २०० लाख | ---- |
| नविन सुचविलेले काम<br>मनपा भवन येथे विस्तारीत इमारत बांधणे व पुणे मनपा मिळकतीमध्ये क्षेत्रिय कार्यालय/प्रशासकीय इमारतीचे विस्तारीकरण करणे | ---- | १२५० लाख |

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.८/१/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २२६५**

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात मंजूर अंदाजपत्रकीय तरतुदीचे वर्गीकरणाला मंजुरी देणे ही बाब मा.स्थायी समितीचे अखत्यारीतील बाब असल्याने तसेच प्रशासनाकडे दि.१५.१२.२०१८ नंतर प्राप्त होणाऱ्या वर्गीकरण मंजुरीचे ठरावांवर कार्यवाही करणे प्रशासनास शक्य होणार नसल्यामुळे सदरची बाब मा.स्थायी समितीचे निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त बाब मा.स्थायी समितीचे व त्यांचेमार्फत सर्व माननीय पदाधिकारी व सभासदांचे निदर्शानास आणून देणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/७८२ दि.४/१२/२०१८ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.८/१/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २२६६**

पुणे मनपाच्या हद्दीतील वर्गीकरण केलेला घनकचरा वाहतूकीसाठी भाडेतत्वावर ६ क्यु.बी. ते ९ क्यु.बी. क्षमतेचे टिपर पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बालाजी अर्थमुव्हर्स ॲन्ड लॅन्ड डेव्हलपर्स, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२४,९९,०००/- पेक्षा पुर्वगणनपत्रकावर १५% जादा) असल्याने त्यांचेकडून र.रु.२८,७३,८५०/- पर्यंत भाडेतत्वावर घेणे व त्याकामी त्यांचेबरोबर करारनामा करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/८७८ दि.२०/१२/२०१८ चे पत्र.

१) मे.बालाजी अर्थमुव्हर्स ॲन्ड लॅन्ड डेव्हलपर्स, पुणे यांचेकडून त्यांचे टेंडरदराने (पुर्वगणनपत्रकावर १५% जादा) एकूण रक्कम रु. २८,७३,८५०/- (अक्षरी रक्कम रुपये अठ्ठावीस लाख त्र्याहत्तर हजार आठशे पन्नास फक्त) पर्यत करुन घेणेस व त्याकामी त्यांचे बरोबर करारनामा करणेस,

२) मे. बालाजी अर्थमुव्हर्स ॲन्ड लॅन्ड डेव्हलपर्स, पुणे यांचेकडून पुणे मनपाच्या हद्दीतील वर्गीकरण केलेला घनकचरा वाहतूकीसाठी भाडेतत्वावर ६ क्यु.बी. ते ९ क्यु.बी. क्षमतेचे टिपर पुरविणे हे काम दि.१७/११/२०१८ पासून सुरु करण्यात आलेले असल्याने प्रकरणी मान्यता मिळेपर्यतचे कामाकरीता पश्च्यात मान्यता मिळणेस,

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.८/१/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २२६७**

पुणे महानगरपालिकेकडून जाहिरात फलक परवानगी व नूतनीकरण दिलेल्या सर्व जाहिरात फलक धारकांकडून परवानगीच्या दिनांकापासून ते आजपर्यंत व्यावसायिक दराने कर आकारणी करण्याबाबत मा.सौ.चाँदबी नदाफ, मा.सौ.राजश्री काळे व मा.सौ.वैशाली मराठे यांचे दि.१६/८/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ९६१ दि. २८/८/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/७८६ दि.६/१२/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.८/१/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २२६८**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.प्रमोद ओसवाल व मा.सौ.चाँदबी नदाफ यांचे दि.१३/३/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २३९९ दि. २०/३/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६३ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.८/१/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २२६९**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.बाळा ओसवाल व मा.योगेश ससाणे यांचे दि.२७/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १४२३ दि. २८/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६४ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.८/१/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २२७०**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.अविनाश बागवे व मा.मुक्तारी अलगुडे यांचे दि.१५/९/२०१५ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ११४७ दि. १५/९/२०१५ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६५ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.८/१/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २२७१**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.योगेश ससाणे व मा.बाळा ओसवाल यांचे दि.१४/२/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २१९३ दि. २०/२/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६६ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.८/१/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २२७२**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.अविनाश बागवे, मा.सौ.वैशाली मराठे, मा.अभिजित कदम, मा.सौ.सुनिता गलांडे यांचे दि. १२/३/२०१३ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २६५४ दि. १९/३/२०१३ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६७ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.८/१/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २२७३**

इमारतीचे साईड फ्रंट मार्जिन जाहिरात फलकांबाबत मा.अविनाश बागवे व मा.प्रिया गदादे यांचे दि.१३/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १३१३ दि. २१/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६८ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला फेरअभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.८/१/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २२७४**

पुणे मनपाच्या हद्दीमध्ये जागोजागी पडलेला कचरा गोळा करून हायवा २५१६ या प्रकारचे १५ क्यु. मी. क्षमतेच्या टिपर वाहनांनी वाहतुक करणे कामी टेंडर्स मागविली असता मे.बालाजी अर्थमुव्हर्स अ‍ॅन्ड लॅन्ड डेव्हलपर्स, पुणे यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु.९९,९९,०००/- पेक्षा पुर्वगणनपत्रकावर १५% जादा) असल्याने त्यांचेकडून रक्कम रु.१,१४,९८,८५०/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी चौदा लाख अठ्याण्णव हजार आठशे पन्नास फक्त) पर्यंत भाडेतत्वावर घेणे व त्याकामी त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/८५२ दि. १७/१२/२०१८ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.८/१/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २२७५**

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात सुरु असलेले विविध प्रकल्पाकरिता माहे मार्च २०१९ अखेर कमी पडणारी रक्कम पथ विभागाकडील इतर कामामधील शिल्लक राहणाऱ्या र.रुपये ९२५ लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करुन देणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/९३८ दि.१/१/२०१९ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, मुख्य अभियंता (पथ)<br>१) **CE20A1263/A16-16,** पाटील इस्टेट जंक्शन ते हॅरिज ब्रीज पुणे मुंबई रस्ता पर्यंत-रस्ता रुंदीकरण करणे व BRT मार्ग विकसित करणे व इतर तदनुषंगिक कामे करणे | ५०० लाख | ---- |
| २) **CE20A1263/A16-14,** सिमला ऑफिस चौक ते राजीव गांधी पुल, औंध, गणेश खिंड रस्ता, येथे रस्ता रुंदीकरण करणे व BRT मार्ग विकसित करणे व इतर तदनुषंगिक कामे करणे | २००लाख | ---- |

| | | |
|---|---|---|
| ३) **CE20E101/F1-13,** लोहगाव वाघोली रस्ता मनपा हद्दीपर्यंत डी.पी. प्रमाणे २४ मी.रुंदीप्रमाणे ताब्यात घेवून दोन्ही बाजूस पावसाळी लाईन टाकून रस्ता डांबरीकरण करणे<br>४) **CE20A1249/A6-50,** मगरपट्टा ३० मी.डी.पी. रस्ता विकसित करणे<br>५) **CE20A102/SA2-1727,** वैकुंठ मेहता इन्स्टिट्यूट मधून युनिव्हर्सिटी सर्कल ते मागील गेटपर्यंतचा रस्ता करणे | ५० लाख<br>७५ लाख<br>१०० लाख | ----<br>----<br>---- |
| सुचविलेले काम<br>मुख्य अभियंता (पथ)<br>१) **CE20A1263/A16-11,** सातारा रोड BRT मार्ग विकसीत करणे.<br>२) **CE20A1262/A9-283,** कात्रज कोंढवा रस्ता राजस सोसा. ते खडीमशिन चौक ते पिसोळी गाव पुणे मनपा हद्द रस्ता ८४ मी.रुंद डी.पी.रस्त्याचे काम करणे<br>३) **CE20A103/A13-112,** नगर रस्ता - शादुल बाबा चौक ते खराडी बायपास फुटपाथ विषयक कामे करणे<br>४) **CE20A102/SA2-911,** प्रभाग क्र. ३६ मधील बिबवेवाडी मुख्य रस्ता विकसित करणे<br>५) पुरु सोसायटी स.नं.२३५, २३६, २३९ लोहगाव येथील रस्ता विकसित करणे | ----<br>----<br>----<br>----<br>---- | २५०लाख<br>२०० लाख<br>१५० लाख<br>१५० लाख<br>१७५ लाख |

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.८/१/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २२७६**

पुणे मनपाच्या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकतील शिल्लक राहणाऱ्या रकमेतून पुणे महानगरपालिकेच्या सेवक व निवृत्त सेवक यांचे वैद्यकीय सहाय्य योजनेच्या बिलांच्या प्रतिपूर्तीसाठी र. रु. ५,००,००,०००/- (अक्षरी :- पाच कोटी फक्त) खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करुन देण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/९९५ दि.५/१/२०१९ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, आरोग्य कार्यालय पुणे महानगरपालिका, शहरामध्ये नव्याने दवाखाने, प्रसतुतीगृह बांधणे, दवाखान्यासाठी विविध उपकरणे खरेदी करणे, विविध विकास कामे करणे. CE17A242/ SJ6-93, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय | ५,००,००,०००/- | ---- |
| नविन सुचविलेले काम<br>आरोग्य कार्यालय, ७ क रूग्णालय व प्रसतुतीगृह व औषाधलय इ., RE17F153 D, ब२. मनपा सेवकांसाठी रिएम्बंर्समेंट | ---- | ५,००,००,०००/- |

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.१६/१/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २२७७**

मा.स्थायी समितीने मान्य केलेल्या टेंडर क्रमांक ४५ सन २०१७-१८ व सन २०१८-१९ मधील मान्य ठेकेदार श्री एंटरप्राईजेस व दिशा एजन्सी यांचेकडून अनुक्रमे कमला नेहरू रूग्णालय व १.राजीव गांधी हॉस्पिटल २.जयाबाई सुतार हॉस्पिटल ३.डॉ.नायडू सांसर्गिक रूग्णालय ४.सोनावणे हॉस्पिटलकडील अंर्तगत व बाहय परिसराची जंतुनाशकासहित यांत्रिकी पध्दतीने साफसफाईचे काम पुढील पाच महिने मुदतीकरीता (ऑक्टोबर २०१८ ते मार्च २०१९पर्यंत) करणेकामी रक्कम रूपये २,६५,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये दोन कोटी पासष्ट लाख फक्त ) पर्यंत वर्गीकरणाव्दारे आर्थिक तरतूद उपलब्ध करून देणेस व त्यांच्याशी आवश्यक तो करार करणेस,बिलांची रक्कम अदा करणेस तसेच वाढीव औषधे खरेदी करणेकामी र. रु. २,६५,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये दोन कोटी पासष्ट लाख फक्त) खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करुन देण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/९९६ दि.५/१/२०१९ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, आरोग्य कार्यालय पुणे महानगरपालिका, शहरामध्ये नव्याने दवाखाने, प्रसतुतीगृह बांधणे, दवाखान्यासाठी विविध उपकरणे खरेदी करणे, विविध विकास कामे करणे. CE17A242/ SJ6-93, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय | २,६५,००,०००/- | ---- |
| नविन सुचविलेले काम<br>आरोग्य कार्यालय, ७ क रूग्णालय व प्रसतुतीगृह व औषाधलय इ., RE17F140B, कमला नेहरु रुग्णालयांकडील व इतर रुग्णालय येथे विविध सेवक वर्ग ठेकेदार पध्दतीने नेमणे | ---- | २,६५,००,०००/- |

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.१६/१/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

## संकिर्ण

विषय क्र. २२७८

स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण उपक्रम (कालावधी २०१८-२०१९ ते २०२०-२०२१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्राचे संयुक्त सहकार्याने राबविणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/समाज विकास/९५१,दि.१/१/२०१९ चे पत्रावर झालेला मा.महिला व बाल कल्याण समिती सभा ठराव क्र.१२६ दि.९/१/२०१९ विचारासाठी.

१. पुणे महानगरपालिका, समाज विकास विभाग व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र यांचे संयुक्त प्रकल्पान्वये मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत तसेच युवक कल्याणकारी योजने अंतर्गत **M.P.S.C.** व **U.P.S.C.** स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण योजना सन २०१८-१९ ते सन २०२०-२०२१ या कालावधी पर्यंत या पूर्वीप्रमाणे राबविणेस व त्याप्रमाणे या संस्थेबरोबर तीन वर्ष कालावधी करीता करारनामा करणेस तसेच प्रती प्रशिक्षणार्थी र.रू.१७०००/-या प्रमाणे मागासवर्गीय गटातील १०० विद्यार्थ्यांचा प्रशिक्षण खर्च र.रू. १७,००,०००/- व खुल्या गटातील ५० विद्यार्थ्यांचा प्रशिक्षण खर्च र.रू.८,५०,०००/-सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्रास अदा करणेस.

२. पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागामार्फत स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण आयोजित करणेकरीता जाहिरात प्रसिद्ध करणेत येऊन ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविणेस.

३. अ. स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण उपक्रम अंतर्गत **SC/ST/NT** गटातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरीता तसेच खुल्या गटातील विद्यार्थ्यांकरिता कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न र.रू.एक लाखाचे आत असणारी उत्पन्न मर्यादा अट रद्द करणेस.(मा. मुख्य सभा ठ. क्र. ३२५, दि. १८/९/२०१५ अनु. क्र. ३-अ अन्वये)

ब. मागासवर्गीय अनुसुचीत जाती (**S.C.**),अनुसुचीत जमाती (**S.T.**),विमुक्त भटक्या जाती व जमाती (**N.T.**) गटातील विद्यार्थ्याची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्रामार्फत निवड परीक्षा घेणेत येऊन पात्र १०० विद्यार्थ्यांना या योजने अंतर्गत स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण देणेस तसेच खुल्या गटातील विद्यार्थ्यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्रामार्फत निवड परीक्षा घेणेत येऊन पात्र ५० विद्यार्थ्यांना या योजने अंतर्गत स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण देणेस.

४. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्राचे ठिकाणी आयोजित करणेत येणाऱ्या प्रशिक्षण करीता विद्यार्थ्यांना जाणे येणे करीता बस पास प्रवास खर्चाची रक्कम पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागामार्फत सन २०१८-२०१९ ते सन २०२०-२०२१ या कालावधी करीता अदा करणेस. (या करीता विद्यार्थ्याने प्रथमतः बस पास स्वखर्चाने काढणे आहे. विद्यार्थ्यास घर ते महाविद्यालय/सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र व परत घरी अशा प्रकारे बस पास प्रवास खर्चाची रक्कम अदा करणेत येईल.) (मा. मुख्य सभा ठ. क्र. ३२५, दि. १८/९/२०१५ अनु. क्र. ४ अन्वये)

५. या योजने करीताच्या मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या परीशिष्ट 'अ' मधील नमूद अटी व नियमास मान्यता मिळणेस.

६. मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता या उपक्रम अंतर्गत होणारा खर्च सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील ४ अ मागासवर्गीय कल्याणकारी योजना निधी FE14B121 मागासवर्गीय विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र चालविणे या अर्थशिर्षकावरील र.रू. २०.०० लाख या उपलब्ध तरतूदीमधून खर्ची करणेस. तसेच खुल्या गटातील विद्यार्थ्यांकरिता या उपक्रम अंतर्गत होणारा खर्च सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील ४क युवक कल्याणकारी योजना निधी **FE१४D१२९** स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र चालविणे या अर्थशिर्षकावरील र.रू. ३०.०० लाख या उपलब्ध तरतूदीमधून खर्ची करणेस.

७. प्रती वर्षी या योजने करीता मनपा अंदाजपत्रकामध्ये स्वतंत्र आर्थिक तरतूद करणेस. (मा. मुख्य सभा ठ. क्र. ३२५, दि. १८/९/२०१५ अनु. क्र. ७ अन्वये)

८. पुणे महानगरपालिका मार्फत सुरू करणेत येणाऱ्या या अभिनव शैक्षणिक सहाय्य योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करीत असताना वेळोवेळी आवश्यकते प्रमाणे योजनेच्या नियम अटी मध्ये तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास देण्यात येणाऱ्या प्रती विद्यार्थी प्रशिक्षण खर्चा पोटीच्या रक्कमेमध्ये त्या त्या परीस्थिती नुसार वाढ करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त किंवा ते प्राधिकृत करतील त्या अधिकाऱ्यास देणेस

सुनिल पारखी
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)